दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक


# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १५० • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 23 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 150 • Pages 4 • Rate 4 Rs







# बनावट दारूचा पर्दाफाश

## राज्य उत्पादन शुल्कची वादळी कारवाई; लाखोंचा मुद्देमाल जप्त

**केज तालुक्यात बनावट दारू वाहतुकीचा मोठा पर्दाफाश करत राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली आहे. या कारवाईत बनावट विदेशी व देशी दारूचा मोठा साठा, चारचाकी वाहन व मोबाईल फोन असा एकूण ७ लाख ३६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. एक आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.**

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

**गुप्त माहितीवरून छापा**

मा. अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बीड श्री. विश्वजीत ए. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी कळंब–अंबाजोगाई रोडवरील युसुफ वडगाव शिवारात वाहन तपासणीदरम्यान संशयास्पद चारचाकी वाहन अडविण्यात आले. तपासणीमध्ये संबंधित वाहनातून मोठ्या प्रमाणावर बनावट दारू आढळून आली.

**जप्त मुद्देमालाचा तपशील**

मारुती सुझुकी स्विफ्ट (MH 14 EP 3741) – अं. किं. ३,८०,०००

रॉयल स्टॅग (बनावट) ५२८ ु १८० मिली बाटल्या – १,३२,०००

देशी दारू टँगो पंच (बनावट) २१०० ु ९० मिली बाटल्या – ८४,०००

मोबाईल फोन (Samsung -14, Samsung Fold, iPhone 13)

एकूण मुद्देमाल : ७,३६,००० असा मिळून आला आहे.

**आरोपी अटकेत; एक फरार**

या प्रकरणी रेवन सोपान नखाते (वय ३५, रा. मंगळवाडी, ता. धारूर, जि. बीड) वगणेश मारोती धुमाळ (वय ३५, रा. उपळाई रोड, बार्शी, जि. सोलापूर) यांना अटक करण्यात आली आहे.पप्पू कदम हा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.



**कायदेशीर कारवाई**

आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट दारू मानवी जीवितासाठी अत्यंत धोकादायक असल्याने अशा गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा उत्पादन शुल्क विभागाने दिला आहे.

**कारवाईत सहभाग**

ही कारवाई निरीक्षक डी.डी. चोरे, दुय्यम निरीक्षक एस.टी. कुंदे, जे.डी. कोरे यांच्यासह भरारी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडली. पुढील तपास सुरू आहे.

**बनावट दारू म्हणजे मृत्यूला आमंत्रण!**

स्वस्ताच्या मोहात बनावट दारू सेवन केल्यास जीविताला गंभीर धोका निर्माण होतो. अशा दारूमुळे अंधत्व, गंभीर आजार तसेच मृत्यू होण्याची शक्यता असते. समाजाने बनावट दारूविरोधात सजग राहून अशा गैरप्रकारांची माहिती तत्काळ प्रशासनाला द्यावी. सुरक्षित जीवनासाठी अवैध व बनावट दारूला नकार द्या – प्रशासनाला सहकार्य करा.

# एकनाथ शिंदेंनी अचानक गाठली दिल्ली:भाजपच्या नेत्यांशी गुप्त भेटीगाठी

## मुंबई महापालिकेच्या महापौरपदावर चर्चा झाल्याची माहिती

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून सत्ताधारी शिवसेना व भाजपमधील कथित तिढा अजून सुटला नाही. त्यातच शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंगळवारी रात्री अचानक दिल्ली दौऱ्यावर गेलेत. तिथे त्यांनी भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी संवाद साधल्यामुळे मुंबईतील सत्ता स्थापन करण्याचा तिढा लवकरच निकाली निघण्याची शक्यता आहे.मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपचा सर्वाधिक ८९ जागांवर विजय झाला आहे. तर शिंदे गटाला अवघ्या २९ जागांवर समाधान मानावे लागले आहे. भाजपला शिंदे गटाच्या मदतीशिवाय मुंबईत आपला महापौर बसवणे अवघड आहे. त्यामुळे शिंदे गटाने आपले उपद्रवमूल्य दाखवत भाजपपुढे अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव सादर केल्याची माहिती आहे. यामुळे निकाल लागू ५ दिवस लोटले तरी मुंबईला अद्याप आपला महापौर मिळाला नाही. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे मंगळवारी रात्री अचानक दिल्लीच्या दौऱ्यावर पोहोचलेत.

इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, मुंबईचे भाजप अध्यक्ष अमित साटम व शिंदे गटाचे माजी खासदार राहुल शेवाळे सध्या दिल्लीत आहेत. हे दोन्ही नेते मुंबईच्या महापौर पदावर तोडगा काढण्यासाठी सातत्याने चर्चा करत आहेत. त्यांची चर्चा सुरू असताना एकनाथ शिंदे मंगळवारी रात्री अचानक दिल्ली दौऱ्यावर पोहोचले. तिथे त्यांनी भाजपच्या उच्चपदस्थ नेत्यांची भेट घेऊन महापौर व इतर समित्यांवर चर्चा केली. त्यांचा हा दौरा अत्यंत गुप्त होता. त्यांनी कुणालाही या दौऱ्याची कल्पना दिली नव्हती. त्यामुळे त्यांच्या दौऱ्यावरील मुंबईतील सत्ता स्थापनेच्या तिढ्यावर बरेच काही घडल्याचा दावा



केला जात आहे.विशेषतः एकनाथ शिंदेंच्या दिल्ली दौऱ्यामुळे शिंदे गट मुंबई महापालिकेतील सत्तेच्या वाट्यावरील आपल्या भूमिकेवर अजूनही ठाम असल्याचेही संकेत मिळत आहेत. दिल्लीतील चर्चेत केवळ मुंबईच्या महापौर पदावरच नव्हे तर इतर महापालिकांमधील सत्तेच्या वाटपावरही खलबते झाल्याची माहिती आहे. यात ठाणे, कल्याण – डोंबिवली आदी महापालिकांचा समावेश असल्याची माहिती आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे शिंदे गटाने मुंबईतील आपल्या नवनिर्वाचित नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये ३ दिवस ठेवले होते. संभाव्य फोडाफोडीच्या राजकारणामुळे त्यांनी शिंदे गटाने हे पाऊल उचलले होते. पण मंगळवारी अखेर पक्षाने आपल्या नगरसेवकांचे विजयाचे प्रमाणपत्र, आधार कार्ड व इतर दस्तऐवजांच्या मूळ प्रती स्वतःच्या ताब्यात घेतल्या. त्यामुळे या नगरसेवकांना आपल्या घर व मतदारसंघाकडे जाण्याची परवानगी देण्यात आली.

# अन्याया विरोधात आज केज शहरामध्ये कॅन्डल मार्च अनुष्काला न्याय देण्यासाठी नागरिक उतरणार रस्त्यावर



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

लातूर येथील नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनी अनुष्का हिच्यासंशयास्पद मृत्यू प्रकरणातील दोषींना अटक करून अनुष्काला न्याय मिळावा,या मागणी साठी केज शहरात भव्य कॅन्डलमार्च चे आयोजन करण्यात आले आहे. अन्याया विरोधात आवाज उठवण्यासाठी महिला, युवक व बहुजन समाज मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार आहेत.आज शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौका पासून संविधान चौक,शासकीयविश्रामगृह मार्गे हा कॅन्डल मार्च काढण्यात येणार आहे. अनुष्काच्या मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करून खऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी,अशी ठाम मागणी यावेळी करण्यात येणार आहे.या कॅन्डल मार्चचे आयोजन केज शहरातील सर्व सामाजिक संघटना, महिलामंडळे तसेच शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वतीने करण्यात आले आहे. अनुष्काला न्याय मिळालाच पाहिजे या घोषणांनी केज शहर दुमदुमणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे,अनिल लोखंडे व आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## वादळी कट्टा

लाईक्स मिळाले की उगवतो इथं बनावट सूर्य,
दिसण्यालाच देव मानून माडली विवेकाची मूर्ती.
फीडमध्ये देवदूत, आयुष्यात मात्र भिकारी,
देखाव्याच्या नशेत हरवली माणुसकी सारी.

फोटोला फिल्टर, विचारांना मात्र गंज,
दाखवायचं स्वर्गजीवन, जगणं मात्र कर्ज.
हसरा चेहरा पोस्टला, आत रडतं मन,
सोशल मीडियावर विकलं जातं रोजचं जीवन.

पोस्टमध्ये तत्वज्ञान, कृतीत मात्र शून्य,
स्टेटसमागे शहाणपण, वागण्यात संपूर्ण अज्ञान.
लाईक्ससाठी विचारांची होते रोजच नीलामी,
सोशल मीडियावर सन्मानाला नाही किंमत, फक्त रिकाम्या हिंमती.

फीडवर समाजसुधारक, घरात मात्र हुकूमशहा,
टिप्पणीला मोठे शब्द, कृतीत रिकामेपणा.
देखाव्याच्या बाजारात विकली जाते नीती,
स्क्रोल करत करत संपते स्वतःची ओळख व स्मृती.

संपादक
अजय भांगे



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले)लढ्याला यश केवड येथील दलित स्मशानभूमीचा प्रश्न अखेर सुटला

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील केवड येथील दलित समाजाच्या स्मशान भूमीवर शेतकऱ्यांनी केलेले अतिक्रमण हटविण्याची दीपक कांबळे यांनी केलेल्या मागणी आणि आंदोलनाला यश आले आहे. सदर अतिक्रमण तात्काळ अतिक्रमण हटवून खुले करण्याचे आदेश तहसीलदार यांनी भूमी अभिलेख विभाग आणि मंडळ अधिकाऱ्यांना दिले आहेत.



या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील केवड येथील गट नंबर ९५ मध्ये असलेल्या दलित समाजाच्या स्मशानभूमीवर शेजारील शेतकऱ्याने अतिक्रमण करून ती जमीन कसत होते. या गट नंबरमध्ये दलितांची मागील अनेक पिढ्या पासून दलित समाज त्या ठिकानी अंत्यविधी करीत आहेत. परंतु मागील तीन वर्षा पासून तेथील शेतकऱ्यांनी त्या स्मशान भूमीची जमीन वहीत करून त्यावर पेरणी करणे सुरू केले होते. त्यामुळे दलित समाजातील लोकांना अंत्यविधीसाठी अनेक समस्या येत होत्या. यामुळे हरेंद्र तुपारे समाधान तुपारे,उत्तरेश्वर तुपारे, भारत तुपारे, छबु तुपारे, शाहू तुपारे, सुदाम गवळी, अंकुश तुपारे, लक्ष्मण तुपारे, महेंद्र तुपारे, मिलिंद तुपारे, जालिंदर तुपारे, मधुकर तुपारे, भिमराव तुपारे, यांनी ही बाब रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या निदर्शनास आणून दिली आणि अतिक्रमण हटविण्याची मागणी केली होती. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली रवींद्र जोगदंड, गौतम बचुटे, दिलीप बनसोडे, रमेश निशिगंध,सुरज काळे, प्रशांत हजारे, मिलिंद भालेराव, दादाराव धेंडे, विनोद शिंदे, बाळासाहेब जानराव,कैलाश जावळे,मसू बचुटे, हरिश गायकवाड,विनोद गायकवाड , राहूल काळे यांनी अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी मागील तीन वर्षापासून उपोषण, निदर्शने आणि आंदोलने करण्यात आली होती. जिल्हाधिकारी बीड आणि उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई, तहसीलदार यांना निवेदने देखील दिले होते.

या लढ्याला अखेर यश आले असून तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दि. ५ जानेवारी रोजी भूमी अभिलेखचे उप अधीक्षक आणि मंडळ अधिकारी यांना काढलेल्या लेखी आदेशात जानेवारी पर्यंत हद्द व खुणा कायम करून ही स्मशानभूमी वापरासाठी ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्याचे आदेश पारित केला आहे.

# संपादकीय

## तांदूळनिर्यातीला वेसण

भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली कच्च्या तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलीकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी हवालदिल झालेल्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी आता भारताच्या तांदूळ निर्यातीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे. त्याद्वारे त्यांनी भारताला एका नवीन मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की, भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डंपिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने तांदळाचे डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर आधारित आहे. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत.ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टॅरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उज्ज्वल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरियाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात. संस्था तेवढाच शेतमाल उत्पादित करून परदेशांना निर्यात करतात. इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे; परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्राएलचा शेतकरी सधन झाला. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डंपिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने 'ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते.डंपिंगबाबत वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की डंपिंग तंत्राचा वापर करून कोणत्याही देशाने दुसऱ्या देशातील शेतकऱ्यांचे नुकसान करू नये. ते व्यापार तंत्राच्या विरोधी होईल आणि निषिद्ध मानले जाईल. डंपिंगमध्ये एखादा देश दुसऱ्या देशात इतका शेतमाल निर्यात करतो की दुसऱ्या देशातील भाव एकदम कोसळून तेथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. या पार्श्वभूमीवर भरपूर शुल्क लादले गेले असतानाही बासमती तांदूळ इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकेच्या बाजारात कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती उपलब्ध झाल्यास प्रत्येक भारतीयाला 'ऑपरेशन सिंदूर'सारखाच याही घटनेचा अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही.

# हरितक्रांतीच्या काळ्या पाऊलखुणा



उदाहरणार्थ, तांदूळ आणि गहू यांच्या अधिक उत्पादक वाणांसाठी रासायनिक खतांचा वाढता वापर अनिवार्य ठरला. अशा खतांच्या उत्पादनासाठी खनिज द्रव्यांचा वापर होत असल्यामुळे १९७३ साली 'ओपेक' राष्ट्रांनी खनिज तेलाच्या किमती सुमारे चौपट केल्यावर स्वाभाविकपणे रासायनिक खतांच्या किमती गगनाला भिडल्या. अशा परिस्थितीत धान्यांच्या उत्पादनखर्चात वाढ होऊ नये आणि शेतकऱ्यांच्या नफ्यात घसरण होऊ नये या उदात्त हेतूने केंद्र सरकारने रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरीत्या रोखून धरल्या. या प्रक्रियेचा आर्थिक भार केंद्र सरकारला उचलावा लागतो. त्यासाठी आजच्या घडीला वार्षिक सुमारे २.५ लाख कोटी रुपयांचा भार केंद्र सरकारच्या तिजोरीवर पडतो.रासायनिक खतांच्या किमती कृत्रिमरीत्या रोखून धरल्यामुळे युरिया या खताचा वापर औद्योगिक क्षेत्रातही होत असे. ही गळती थांबविण्यासाठी केंद्र सरकारने युरियाला कडुलिंबाचा लेप (उेरीं) देण्यास सुरुवात केली. या प्रक्रियेमुळे युरियाचा औद्योगिक क्षेत्रातील वापर बंद झाला. परंतु भारतात रासायनिक खतांच्या किमती केंद्र सरकारने कृत्रिमरीत्या रोखून ठेवल्यामुळे अशी खते चोरट्या मार्गाने पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका अशा शेजारच्या देशांत निर्यात होऊ लागली. परिणामी अशा शेजारच्या देशांमधील शेतकऱ्यांना रासायनिक खते स्वस्तात मिळू लागली. हा अवैध व्यापार थांबविण्यास भारत सरकारला यश मिळाले नाही.हरितक्रांतीपूर्वी देशात मोठ्या प्रमाणावर ज्वारी, बाजरी यांसारखी लक्षणीय प्रमाणात कमी पाणी लागणारी पिके घेतली जात होती. परंतु हरितक्रांतीनंतर भात, गहू अशी अधिक पाणी लागणारी पिके घेण्यास सुरुवात झाली. पंजाब, हरियाणा अशा राज्यांत भाताच्या पिकाला पुरेसा पाऊस पडत नाही. तरीही तेथील शेतकरी भाताचे पीक घेतात आणि त्यासाठी भूगर्भातील पाण्याचा बेसुमार उपसा करतात. पाण्याचा असा उपसा करण्यासाठी राज्य सरकारे शेतकऱ्यांना जवळपास फुकटात विजेचा पुरवठा करतात. तसेच केंद्र सरकार शेतकऱ्यांनी पिकविलेला तांदूळ निर्यात करण्याचे काम करते. अशा रीतीने एक प्रकारे पाण्याची तर निर्यात होतेच; पण त्याचबरोबर भूगर्भातील पाण्याचा उपसा करण्यासाठी खर्च होणारा विद्युत पुरवठा, तांदळाच्या उत्पादनासाठी लागणारी रासायनिक खते अशा उत्पादक घटकांवर होणाऱ्या सरकारच्या खर्चाचा भार अंतिमतः भारतामधील कर भरणाऱ्या लोकांना वाहावा लागतो आणि त्याचा लाभ विदेशातील ग्राहकांना होतो. या विसंगतीकडे भारतीय अर्थतज्ज्ञांनी दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येते.

हरितक्रांतीमुळे ज्वारी, बाजरी अशा खाद्यान्नाऐवजी तांदूळ व गहू अशा धान्यांच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्याचा अनिष्ट परिणाम लोकांच्या जीवनावर झाला. तसेच ज्वारी, बाजरीची धाटे हा गुरांसाठी पौष्टिक सुका चारा होता, तो पूर्णपणे बंद झाला. भाताचा पेंढा आणि गव्हाचे काड हा गुरांसाठी निरुपयोगी चारा असल्यामुळे पंजाब व हरियाणा या राज्यांतील शेतकरी असे पिकांचे अवशेष जाळून टाकतात. अशा प्रदूषणामुळे दिल्ली व त्याच्या आसपासच्या रहिवाशांना प्रदूषणाचा उपद्रव होतो आणि त्यांच्या आयुर्मानात घट होते.हरितक्रांतीमुळे पंजाब व हरियाणा या राज्यांत खरीप हंगामात भात आणि रब्बी हंगामात गहू अशी पिके घेतली जातात. त्यामुळे भूगर्भातील पाण्याचा साठा खूपच कमी झाला आहे. त्यामुळे तेथील नागरिकांना घरगुती वापरासाठी चांगले पाणी मिळत नाही. तेथील नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या पाण्यात घातक क्षारांचे प्रमाण बेसुमार वाढल्याचा अनिष्ट परिणाम लोकांना भोगावा लागतो. या प्रक्रियेची टोकाची परिणती म्हणजे पंजाब राज्यातून दररोज रेल्वेची एक गाडी भरून कर्करोगग्रस्त नागरिक उपचारांसाठी इतर राज्यांची वाट धरतात.पंजाब व हरियाणा या राज्यांमधील शेतकऱ्यांनी खरीप आणि रब्बी हंगामात अनुक्रमे भात व गहू ही पिके घेण्याऐवजी सात महिन्यांनी काढणीसाठी तयार होणाऱ्या ज्वारीचा पेरा केला, तर पंजाब व हरियाणा या राज्यांमध्ये हरितक्रांतीमुळे निर्माण झालेल्या समस्या संपतील. ज्वारीचे सदर बियाणे 'इक्रिसॅट' या हैदराबादमधील संशोधन करणाऱ्या संस्थेकडे उपलब्ध आहे. सदर वाणाचे हेक्टरी उत्पादन १० टन एवढे प्रचंड आहे. त्यामुळे ग्राहकांना ज्वारी १५ रुपये किलो दराने मिळेल. ज्वारी अशी स्वस्तात मिळू लागली, की सरकारला सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गहू व तांदूळ अनुक्रमे २ व ३ रुपये किलो दराने वितरित करावे लागणार नाहीत. त्यामुळे सरकारचे वर्षाला सुमारे दोन लाख कोटी रुपये वाचतील.आजकाल बहुतांश शेतकरी त्यांच्या शेतात पिकलेले धान्य सरकारला किंवा व्यापाऱ्यांना किमान आधारभावाने विकतात आणि स्वतःच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी लागणारे धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या दुकानातून खरेदी करतात. कारण खुल्या बाजारात ज्या धान्याचा भाव ३५ ते ४० रुपये आहे, ते धान्य सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत ३ रुपये किलो दराने वितरित केले जात असे. आता मोदी सरकारने ते विनामूल्य वितरण करण्यास सुरुवात केली आहे. देशातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना उपजीविकेसाठी लागणारे धान्य स्वस्तात उपलब्ध करून देणे हे धोरण प्रशंसनीय असले तरी देशातील ६६ टक्के लोक आता दारिद्र्यरेषेखाली नाहीत.आजच्या घडीला दारिद्र्यरेषेखालील लोकांची टक्केवारी १२ टक्क्यांपेक्षा कमी आहे, असा निती आयोगाचा निष्कर्ष आहे. त्यामुळे सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर वर्षाला जे सुमारे दोन लाख कोटी रुपये खर्च करते, त्यातील सुमारे पाच ते सहा टक्के खर्च अनाठायी ठरतो. सरकारच्या या धोरणामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ मिळणारे शेतकरी आपल्या शेतात पिकलेले धान्य सरकारला वा खासगी व्यापाऱ्यांना विकतात आणि आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी लागणारे धान्य मिळविण्यासाठी रेशन दुकानापुढे उभे राहतात. ही आपल्या आर्थिक व्यवस्थेत निर्माण झालेली विकृती आहे. ज्या लोकांची आर्थिक स्थिती बरी आहे असे लोक रेशन घेण्यासाठी दुकानाकडे वळतही नाहीत. त्यांच्या वाट्याचे धान्य रेशन दुकानदार खुल्या बाजारात विकून भरपूर नफा कमावतात. म्हणजे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे उद्दिष्टच साध्य होत नाही. त्यामुळे सरकारने आपल्या धोरणात मूलभूत बदल करणे गरजेचे ठरते.सरकारने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना धान्य वितरित करण्याऐवजी त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये अनुदानाची रक्कम जमा करावी. अशी रक्कम त्यांना धान्याची खरेदी करण्यासाठी वापरता येईल याची नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून खातरजमा करता येईल. असा बदल केला की सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील अनागोंदी संपेल. अन्न महामंडळावरील कामाचा भार कमी होईल. भ्रष्टाचाराला आळा बसेल. १४२ कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशात ८१ कोटी लोकांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत धान्याचे मोफत वाटप करण्याचे धोरण हे निखालस चुकीचे धोरण आहे.भारत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता म्हणून उदयाला येत असताना देशातील ६६ टक्के लोकांना त्यांच्या निर्वाहासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर विसंबून राहावे लागत असेल, तर आपल्याला आर्थिक धोरणाच्या संदर्भात नव्याने विचार करायला हवा. प्रश्न आहे तो हे धोरण बदलणार कोण? 'रेवडी'च्या संदर्भात व्यासपीठावर टीका करणे सोपे आहे. परंतु, ती बंद करणे अवघड बाब ठरते, हेच खरे!

# 'वृद्ध अन् एकटी' च्या समस्या आणि उपाययोजना

समुपदेशन दरम्यान अनेक एकल महिलांचे प्रश्न अभ्यासले जातात. त्यावर मार्गदर्शन केले जाते. अनेकदा वयस्कर महिला ज्यांना आपण सिनियर सिटीझन म्हणू शकतो. या एकट्या राहतात. पतीचे आधीच निधन झाले असल्यास, घटस्फोट झाला असल्यास, अविवाहित असल्यामुळे या महिलांना समवयस्क जोडीदार नसतो. मुलं-मुली असले तरी ते नोकरी, व्यवसायनिमित्त, लग्न झाल्यामुळे दुसऱ्या ठिकाणी वास्तव्याला असतात. या सर्व परिस्थितीमध्ये उतार वयात एकटी राहणारी महिला अनेक आव्हानांना सामोरं जात असते. अशा महिला आर्थिकदृष्टीने संपन्न असल्या किंवा नसल्या तरीही त्यांना जाणवणारे त्रास हे सारखेच असतात. आर्थिक स्वावलंबी महिला सुद्धा फक्त पैसे आहेत म्हणून उतरत्या वयात सुखी राहीलच असे नाही. एकट्या राहणाऱ्या वयस्कर महिलांच्या समस्या आणि त्यांच्या स्वभावाविषयी माहिती, त्यांच्यासाठी उपाययोजना याबद्दलची चर्चा आपण या लेखातून करणार आहोत.समाजात अनेक महिलांना विविध कारणांमुळे उतारवयात एकटं राहतांना आपण बघतोय आपल्या लक्षात येते की त्यांना अनेक शारीरिक आणि मानसिक आव्हानांना तोंड द्यावं लागतं. शारीरिक समस्या हा सर्वात मोठा प्रश्न त्यांना त्रासदायक ठरतो. वाढत्या वयानुसार विविध आजार होतात. त्यात, एकटेपणामुळं वेळेवर औषधं घेणं, डॉक्टरांकडे जाणं किंवा गरजेच्या वेळी मदतीसाठी कोणी नसणं, यांसारख्या अडचणी येतात. घरकाम करतांना उतार वयातील महिलांना मदतीची गरज भासते. घरातली तथा बाहेरील काही कामं करणं अवघड होतं, ज्यामुळे त्यांना मदतनीस नेमावा लागतो. घरासाठी कामवाली व्यक्ती विश्वासू मिळणं महत्त्वाचं असतं. दैनंदिन नियोजन सांभाळून वेळेवर कामावर येणे अशी सर्वांगीण व्यक्ती मदतनीस म्हणून मिळणे उतार वयात आवश्यक असते. आपल्याकडे बहुतांश वेळा घरकामाला कायमस्वरूपी मदतनीस मिळणे अवघड असते, अशी व्यक्ती मिळाल्यास ती फक्त पैसे कमवण्यासाठी व्यावसायिक पद्धतीने काम करते त्यात आपुलकी, प्रेम नसते त्यामुळे ज्येष्ठ महिलांना सेवा मिळू शकते पण त्यात प्रेमाचा अभाव असतो. सुरक्षिततेची कमतरता या महिलांमध्ये पाहायला मिळतो. घरात एकटं राहत असल्यामुळे त्यांच्या बाबतीत चोरी किंवा इतर गुन्हे घडण्याची भीती असते. एकटेपणा हा वृद्ध महिलांसमोरील सर्वात मोठा प्रश्न आहे. कुटुंबीयांपासून किंवा मित्र-मैत्रिणींपासून दूर राहिल्यामुळे त्यांना एकटेपणा वाटतो. उदासीनता आणि नैराश्य त्यांना जास्त प्रमाणात जाणवते. सततचा एकटेपणा, आरोग्याच्या समस्या आणि भविष्याची चिंता यामुळे त्यांना नैराश्य येऊ शकतं.आर्थिक नियोजन, सुरक्षा, आरोग्याची काळजी आणि सामाजिक दबाव यांमुळे त्यांच्यावर सतत मानसिक ताण येतो. त्यातून त्यांचे स्वभाव बदलतात. एकट्या राहणाऱ्या वृद्ध महिलांच्या स्वभावावर त्यांच्या जीवनशैलीचा आणि अनुभवांचा खूप मोठा परिणाम होतो. त्यांच्या वागण्यात आणि सवयींमध्ये काही विशिष्ट गोष्टी दिसून येतात. संवेदनशीलता म्हणजेच त्या खूप हळव्या असतात. त्यांना मदतीची किंवा सहानुभूतीची अपेक्षा असते. कोणत्याही गोष्टीचा जास्त विचार करणं, भविष्याची चिंता, जुन्या आठवणी, घडून गेलेल्या गोष्टींवर पच्छाताप, मन मोकळ करायला कोणी हक्काचे माणूस जवळ नसणे यामुळे त्या सतत विचार करतात. सततच्या असुरक्षिततेमुळे त्या लवकर कुणावरही विश्वास ठेवत नाही. त्यांच्या वागण्यात भीती आणि चिंता दिसून येते. त्यांना सतत असे वाटतं राहते की लोकं आपला गैरफायदा घेतील. या महिलांच्या आयुष्यात परिस्थितीनुसार फार मोठे बदल झाल्यामुळे त्या आपल्या जुन्या सवयी आणि जीवनशैलीला घट्ट धरून ठेवतात. त्यांना नवीन गोष्टी लवकर स्वीकारता येत नाहीत. अशा महिलांच्या स्वभावामागे मानसशास्त्रीय कारणं अभ्यासले असता लक्षात येते की, त्यांना सुरक्षिततेची गरज आहे. उतारवयात शारीरिक आणि भावनिक असुरक्षितता वाढते. त्यामुळे त्या स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी कमी लोकांशी संपर्क ठेवतात, स्वतःच्या कोषात राहतात. त्यामुळे या महिलांच्या आयुष्यात सामाजिक दुरावा निर्माण होतो. सामाजिक कार्यक्रमांमध्ये किंवा कुटुंबात, इतर नातेवाइकांमध्ये त्यांना महत्त्वाचं स्थान मिळत नाही किंवा त्या दुर्लक्षित राहतात त्यामुळे त्या लोकांपासून दूर राहणं पसंत करतात. लोकं आपल्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात असे त्यांना वाटतं असते. आपण आपल्या मनाप्रमाणे आयुष्य जगू शकत नाही ही सल त्यांच्या मनात कायम असते. वय झालेल्या परंतु एकटे राहणाऱ्या महिलांच्या प्रश्नांवर उपाययोजना जाणून घेणे गरजेचे आहे. एकट्या राहणाऱ्या महिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी काही उपाय करता येतात.सामाजिक आणि कौटुंबिक आधार मिळण्यासाठी कुटुंबीयांनी त्यांच्यासोबत नियमित संपर्क ठेवावा, वेळोवेळी त्यांना भेटायला जावं, फोनवर त्यांच्याशी बोलत राहावं यामुळे त्यांना एकटेपणा जाणवणार नाही. शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे मानसिक आरोग्य. मानसिक आरोग्य जपण्यासाठी समुपदेशन मदत करू शकते. त्यामुळे त्यांना योग्य वेळी समुपदेशकाची मदत मिळवून द्यावी. सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे या महिलांसाठी उपयुक्त आहे. अशा महिलांना जवळपासच्या ज्येष्ठ नागरिक संघ, धार्मिक गट, मंडळ, भिशी किंवा इतर सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावं. यामुळे त्यांना नवीन मित्र-मैत्रिणी मिळतील, समवयस्क लोकांशी त्या सुख-दुःख वाटू शकतील. नियमित आर्थिक मदत मिळत राहणे, पैसा उपलब्ध असणे या वयातील प्रमुख गरज असते. त्यामुळे आर्थिक नियोजनाची माहिती त्यांना द्यावी किंवा कुटुंबाने आवश्यक ती आर्थिक मदत करावी.आकडेवारीमध्ये जाणून घेतले असता, साधारणपणे एका शहरात एकट्या राहणाऱ्या वयस्कर महिलांची संख्या किंवा टक्केवारी खूप भिन्न असू शकते आणि ती शहरावर, देशावर आणि वयस्कर महिलेच्या वयोगटावर अवलंबून असते. तरीही, जगभरातील आणि विशेषतः विकसित देशांमधील सामान्य कल पाहिला असता, एकट्या राहणाऱ्या वयस्कर लोकांमध्ये महिलांची संख्या जास्त आहे. सामान्यतः एकट्या राहणाऱ्या वयस्कर लोकांमध्ये पुरुषांपेक्षा महिलांची संख्या लक्षणीयरीत्या जास्त असते. कारण म्हणजे स्त्रियांचे आयुष्य पुरुषांपेक्षा जास्त आहे. उतार वयात घटस्फोट झाल्यावर, पतीचे निधन झाल्यानंतर त्यांचे पुनर्विवाह होण्याची शक्यता कमी असणे. वय वाढत जाईल तसतसे एकट्या राहणाऱ्या महिलांची टक्केवारी खूप वाढते. उदाहरणार्थ (अमेरिकेतील आकडेवारीनुसार) ७५ किंवा त्याहून अधिक वयाच्या सुमारे ४२% ते ५०% महिला एकट्या राहतात, तर ६५ ते ७४ वयोगटातील सुमारे २७% महिला एकट्या राहतात. भारतीय शहरांमध्ये किंवा शहरी भागांमध्ये एकट्या राहणाऱ्या वयस्कर व्यक्तींचे प्रमाण ग्रामीण भागापेक्षा जास्त असते. एकूण वयस्कर लोकसंख्येपैकी प्रमाण पाहिले असता, काही शहरांमध्ये, ६५ वर्षांवरील किंवा त्याहून अधिक वयाच्या एकूण वयस्कर लोकसंख्येपैकी एकट्या राहणाऱ्या महिलांचे प्रमाण ६५% ते ७०% पेक्षा जास्त असू शकते.या समस्यांवर मात करण्यासाठी कुटुंबीय, समाज आणि सरकारने एकत्र काम करणं खूप महत्त्वाचं आहे. अशा महिलांना योग्य भावनिक मानसिक आधार आणि मदत मिळाली, तर त्यांचं आयुष्य अधिक सुखी होऊ शकतं. कुटुंबापासून महिलांना एकटं अथवा लांब राहावं लागणार नाही याच नियोजन घरातील व्यक्तींनी पहिल्यापासूनच करावे. महिला जर पहिल्यापासून नोकरी, व्यवसाय करणारी असेल तर तिने स्वतःचे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य, त्याबद्दलचे नियोजन आधीच करावे. शक्यतो नोकरी करणाऱ्या महिलांना सेवा निवृत्तीनंतर एकदम रिकामपण येते, दिनचर्या बदलते आणि त्यातून त्या एकट्या असतील तर जास्तच त्रासदायक ठरते. विविध सामाजिक संस्था, संघटना, समूह यांनी मोठ्या प्रमाणात कार्यरत होऊन ज्येष्ठ महिलांना विरंगुळा म्हणून, वेगवेगळे उपक्रम, समुपदेशन कार्यक्रम राबवावेत. वयोवृद्ध महिलांना कोठेही घराबाहेर पडायचे असल्यास त्यांना सोबत करण्यासाठी, त्या कामात मदत करण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. वेळोवेळी या महिलांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, आर्थिक दृष्टीने सक्षम नसलेल्या महिलांसाठी आर्थिक मदत करणारी, त्यांना सुरक्षा पुरवणारी शासकीय यंत्रणा, योजना नियमित राबवणे गरजेचे आहे. अशा महिलांसाठी समाजाने, शेजारील लोकांनी, नातेवाइकांनी एकत्रित येऊन मदत करणे हे पण पर्याय असू शकतात.

# केज-बीड रस्त्यावर खड्ड्यात पडून तरुण १२ तासांहून अधिक काळ बेसुध

## ढाकणे दाम्पत्यामुळे जीव वाचला; अपघातस्थळी कोणाच्याच नजरेस न पडल्याने रक्तस्रावातच पडून होता तरुण

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज-बीड रस्त्यावर आंबाळाच्या बरडाजवळ दुचाकी अपघात होऊन एक तरुण तब्बल १२ तासांहून अधिक काळ खड्ड्यात बेसुध अवस्थेत पडून असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्याची अवस्था नाजूक बनली होती. मात्र, सामाजिक कार्यकर्ते बाजीराव नवनाथ ढाकणे व सौ. आशाताई बाजीराव ढाकणे यांच्या सतर्कतेमुळे वेळेत मदत मिळून त्याचा जीव वाचला. जखमी तरुणावर सध्या अहमदनगर येथे उपचार सुरू आहेत. केज-बीड रोडवरील आंबाळाच्या बरडाच्या पूर्वेस असलेल्या पुलाजवळ रस्त्याच्या कडेला चार फूट खोल खड्ड्यात पॅशनप्रो (MH 24 -C 1275) ही मोटारसायकल पडलेली आढळून आली. या ठिकाणी धिरज भवर (रा. हरीनारायण आष्टा, ता. आष्टी) हा तरुण गंभीर जखमी अवस्थेत बेसुध पडलेला होता. प्राथमिक माहितीनुसार, बुधवारी रात्रीच्या सुमारास लातूरहून आष्टी तालुक्यातील हरीनारायण आष्टा येथे जात असताना हा अपघात झाला असावा. अपघातानंतर मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होऊनही तो कुणाच्या निदर्शनास न आल्याने गुरुवारी दुपारी १२ वाजेपर्यंत खड्ड्यातच पडून होता.

दरम्यान, मौजे जोला येथील सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे व सौ. आशाताई ढाकणे हे बीडकडे जात असताना त्यांना खड्ड्यात मोटारसायकल दिसली. संशय आल्याने त्यांनी जवळ जाऊन पाहणी केली असता जखमी तरुण दिसून आला. त्यांनी तातडीने खड्ड्यात उतरून त्यास बाहेर काढले व १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधून बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले. जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचार करून एमआरआय तपासणी केली. जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यास कुटुंबीयांनी अहमदनगर येथे हलविले आहे.

**अपघातातील जखमींना मदत करा; माणुसकी जपा, जीव वाचवा!**

**सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांचे आवाहन**

रस्ता अपघातांचे प्रमाण वाढत असताना अपघातग्रस्त जखमींना वेळेत मदत मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अपघात झाल्यानंतर काही मिनिटांत योग्य मदत मिळाल्यास जखमींचा जीव वाचू शकतो. त्यामुळे नागरिकांनी अपघातस्थळी थांबून मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहन महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य चे बीड जिल्हा समन्वयक तथा सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी केले.



## आयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिर प्राण प्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त पशुपतीनाथ मंदिर नायगाव येथे आरती व भव्य महाप्रसाद



दैनिक वादळ वार्ता
**नायगांव । हानुमंत चंदनकर**

नांदेडच्या नायगांव शहरातील पशुपतिनाथ मंदिर येथे आज दिनांक २२ जानेवारी रोजी अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त सुरेश पाटील कल्याण व सुभाष पाटील कल्याण यांच्या वतीने आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीराम व महादेवाची आरती करून झाली आरतीनंतर भव्य महाप्रसादाचा वाटप करण्यात आलं यावेळी श्रीराम भक्त सुरेश पाटील कल्याण श्री सुभाष पाटील कल्याण मेटकर सर रघुनाथ कल्याण माधव पाटील कल्याण माधव पाटील कल्याण दिलीप पाटील कल्याण महेंद्र शेठ हनुमंत नरता वार पुरोहित गंगाधर स्वामी खैरगावकर सुरेश चव्हाण गणेश पाटील चव्हाण गजानन गादेवार अमोल पोतदार सचिन फुलारी मुस्सा शेट यासह शेअर परिसरातील शेकडो भाविकांनी महाप्रसाद व दर्शनाचा लाभ घेतला.

## साईचरणी दानशूरता! टाटा मोटर्सच्या पुणे रिजन डीलर्सकडून २५ लाखांची 'टाटा सिएरा' अर्पण

### श्री साईबाबा संस्थानच्या ताफ्यात नवी 'टाटा सिएरा'; टाटा मोटर्सकडून २५ लाखांचे वाहन सप्रेम भेट

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । तुषार महाजन**

जागतिक कीर्तीच्या श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरूपात वाहने अर्पण करण्याची परंपरा भाविकांकडून आणि विविध संस्थांकडून अविरत सुरू आहे. याच शृंखलेत आज टाटा मोटर्स, पुणे रिजनच्या सर्व अधिकृत डीलर्सच्या वतीने तब्बल २५ लाख ६९ हजार १९३ रुपये किमतीची 'टाटा सिएरा' ही अत्याधुनिक चारचाकी गाडी संस्थानला देणगी स्वरूपात प्रदान करण्यात आली.

या नवीन वाहनाचे पूजन आणि हस्तांतरण सोहळा आज उत्साहात पार पडला. संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर (भा.प्र.से.) आणि टाटा मोटर्सच्या डीलर्सच्या



हस्ते या वाहनाचे विधिवत पूजन करण्यात आले. नारळ ओवाळून आणि फुलांची माळ अर्पण करून गाडीची चावी अधिकृतरीत्या संस्थानकडे सुपूर्द करण्यात आली.

साईबाबांच्या चरणी सेवा म्हणून हे वाहन दिल्याची भावना यावेळी टाटा मोटर्सच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली. या देणगीबद्दल श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी टाटा मोटर्स, पुणे रिजनच्या सर्व उपस्थित डीलर्सचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला आणि त्यांचे आभार मानले.

संस्थानच्या वाहन ताफ्यात या नवीन गाडीचा समावेश झाल्यामुळे भाविकांच्या आणि संस्थानच्या सेवेत आणखी भर पडली आहे.

## पैठण(सावळेश्वर) येथे केंद्रस्तरीय क्रीडा व विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे उत्साहात संपन्न,विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून मान्यवरांचे लक्ष वेधले

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील पैठण (सावळेश्वर) येथे जिल्हा परिषद शाळा टिकविण्या च्या उद्देशाने व विद्यार्थ्यां मधील शारीरिक,बौद्धिक व सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी केंद्रस्तरीय क्रीडा व विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमात केंद्रातील १३ शाळांतील विद्यार्थी सहभाग नोंदवला होता.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून पैठण येथील सरपंच जयश्रीताई चौधरी होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून संजय चौरे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी गट साधन केंद्र केज,अर्जुन बोराडे केंद्र प्रमुख,बनसारोळा, अण्णासाहेब जाधव केंद्र प्रमुख,पैठण,देवीदास नागरगोजे केंद्रिय मुख्याध्यापक बनसारोळा बाळासाहेब चव्हाण




केंद्रिय मुख्याध्यापक, होळ,गोविंद मुळे केंद्रिय मुख्याध्यापक,पैठण यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमात धावणे, उंचउडी,लांबउडी,कबड्डी, खो-खो आदी क्रीडा स्पर्धांसह शिवरायांच्या वाघिणी आम्हीशिवकन्या, उठो जवान देश के, वसुंधरा पुकारती,उदो ग अंबे उदो,रविवार माझ्या आवडीचा,सुनो गौर से दुनियाँवालो,चिऊ ताई चिऊ माझ्या अंगणात ये, गाडी घुंगराची अशा विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून मान्यवरांचे लक्ष वेधले.त्यामुळे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सादर करता आले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बालासाहेब गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन गोविंद मुळे यांनी केले.

## आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या हस्ते ग्रामपंचायत कोल्हेवाडी येथे पिठाच्या गिरणीचा उद्घाटन सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**


ग्रामपंचायत कार्यालय, कोल्हेवाडी यांच्या वतीने नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत गावातील सर्वसामान्य जनतेसाठी मोफत धान्य दळण्याच्या सुविधेसह पिठाच्या गिरणीचा उद्घाटन कार्यक्रम शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आला आहे.या पिठाच्या गिरणीचे उद्घाटन भास्करराव पेरे पाटील आदर्श सरपंच,पाटोदा, छत्रपती संभाजीनगर यांच्या शुभहस्ते होणार आहे.या उपक्रमामुळे कोल्हेवाडी गावातील शेतकरी,महिला व सर्व सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून गावाच्या स्वावलंबनाच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. विठ्ठलदादा नागरगोजे गट विकास अधिकारी, पंचायत समिती केज,श्री. राठोड साहेब सहाय्यक गट विकास अधिकारी,पं. स.केज,श्री.रोडेवार साहेब विस्तार अधिकारी,पं.स. केज तसेच श्री.महेंद्र धाकपाडे ग्रामविकास अधिकारी,कोल्हेवाडी यांची उपस्थिती लाभणार आहे.उद्घाटन कार्यक्रम सार्वजनिक हातपंपा समोर,कोल्हेवाडी येथे होणार असून या कार्यक्रमाचे स्वागत व आयोजन सरपंच,उप सरपंच,ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रमास मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी उपस्थित राहावे,असे आवाहन ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आले आहे.



## केज येथे सदगुरु ब्रम्ह चैतन्य गोंदवलेकर महाराज जन्मोत्सव सोहळ्या निमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

श्रीराम भक्त,सदगुरु ब्रम्ह चैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या १३ व्या जन्मोत्सवानिमित्त केज शहरात भव्य धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.हे कार्यक्रम शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी ते शुक्रवार,दिनांक ३० जानेवारी २०२६ या कालावधीत श्रीराम मंदिर, पाटील गल्ली,केज येथे पार पडणार आहेत. या जन्मोत्सवा अंतर्गत दररोज विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात येणार असून त्यात श्रीराम कथा,कीर्तन,भजन व महाप्रसादाचा समावेश आहे.शुक्रवार,दिनांक २३ ते गुरुवार,दिनांक २९ जानेवारी २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ५ ते ८ या वेळेत श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे.या श्रीराम कथेचे गायन ह.भ.प.साध्वी डॉ. लोपामुद्राताई सदाशिव बनसोडे(एम.फिल,पि.एच.डी.) यांच्या सुमधुर आवाजात श्री राम कथेचे गायन केले जाणार आहे. शुक्रवार,दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजून १५ मिनिटांनी जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून सकाळी ७ वाजता महाराजांचा अभिषेक करण्यात येणार आहे.तर सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.श्रीराम महाराज जोशी(केजकर) यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर ह.भ.प.श्री उमाशंकर महाराज शिंदे सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस उप निरीक्षक



यांच्या सुमधुर काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन किसन महाजन उमाशंकर शिंदे साबला, जोशी साहेब,श्रीराम शेटे व गोंदवलेकर महाराज भक्त परिवार मंडळ केज यांच्या वतीने करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## साने गुरुजी निवासी विद्यालयात गांधी तिर्थ परिक्षा संपन्न,विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

साने गुरुजी निवासी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज येथे गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांच्या उपक्रमा अंतर्गत होणा-या गांधी संस्कार परिक्षेचे आयोजन करण्यात आले.दि.१० जानेवारी २०२६ रोजी परिक्षाचे आयोजन करण्यात आले होते यात इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतच्या वर्गातील १०२ विद्यार्थी व १० शिक्षकांनी सहभाग नोंदवला परिक्षा समन्वयक संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता गित्ते - कराड यांनी पार पाडली तसेच सुवर्णा सिरसट, दाजी जयदेवी,डोंगरे चंपकला,गुजर लिंबराज, पवार ज्ञानेश्वर तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले परिक्षेकरीता बसलेल्या विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करून वर्ग निहाय प्रथम,व्दितीय, तृतीय क्रमांक काढण्यात येणार आहेत आणि सर्व निकाल गांधी तिर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता जळगाव यांच्याकडे पाठवण्यात येणार आहे तसेच या परिक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.



## ळाकोळी सर्कलची शान भीमाशंकर मामा कापसे

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोकहित सर्वोपरी हे ब्रीद घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात समाजकारणात सक्रिय असलेले, आझाद ग्रुपचे संस्थापक व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष भीमाशंकर मामा कापसे यांचा आज दिनांक २३ जानेवारी रोजी वाढदिवस साजरा होत आहे. माळाकोळी सर्कलची शान म्हणून ओळखले जाणारे भीमाशंकर मामा कापसे यांना विविध स्तरांतून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या जात आहेत. लोहा तालुक्यातील रिसनगावचे भूमीपुत्र असलेले भीमाशंकर मामा कापसे यांनी पुणे येथे आपल्या मेहनतीच्या जोरावर यशस्वी उद्योग उभारला. सर्व सुखसुविधा असूनही समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेतून त्यांनी गेल्या ८-९ वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यात स्वतःला झोकून दिले आहे. आझाद ग्रुपच्या माध्यमातून त्यांनी आपल्या उत्पन्नातील २० ते ३० टक्के रक्कम समाजकार्यासाठी खर्च केली आहे.गरजू व मेडिकल विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना सहाय्य, दवाखाने, लग्नकार्य, महामानव जयंती व धार्मिक उपक्रमांना मदत अशी अनेक लोकोपयोगी कामे ते सातत्याने करत आहेत.



त्यांच्या या कार्यामुळे ते माळाकोळी सर्कल व लोहा तालुक्यात गोल्डन मॅन म्हणून ओळखले जातात.

नुकतेच जनतेच्या आग्रहास्तव त्यांनी समाजकारणातून राजकारणात प्रवेश केला असून माळाकोळी जि.प. सर्कलमधून जिल्हा परिषद निवडणूक लढवावी अशी जोरदार मागणी होत आहे. डोंगराळ व विकासापासून मागे राहिलेल्या या सर्कलच्या सर्वांगीण विकासासाठी ते कटिबद्ध असल्याचे त्यांनी अनेक दौऱ्यांतून स्पष्ट केले आहे.आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो व त्यांच्या हातून अशीच अखंड जनसेवा घडो, तसेच माळाकोळी सर्कलच्या विकासासाठी त्यांना कार्य करण्याची संधी मिळो, अशा सदिच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

**– विलास सावळे**
**तालुकाध्यक्ष, मिडिया पोलिस सोशल क्लब पत्रकार संघ, लोहा**

# ई-केवायसी मुळे योजनेवर संकट!

## त्रुटींमुळे नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यांचे हप्ते अद्याप न मिळाल्याने लाडक्या बहिणी त्रस्त

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

राज्यभर मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेंतर्गत नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांचे हप्ते अद्याप न मिळाल्याने मोठ्या संख्येने लाभार्थी महिला अडचणीत सापडल्या आहेत.

ई- केवायसी प्रक्रियेनंतर करण्यात आलेल्या मोठ्या बदलांमुळे अनेक महिला पात्र असूनही अपात्र ठरवण्यात आल्या आहेत. परिणामी गेल्या दोन आठवड्यापासून त्या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या आहेत. या संदर्भात अनेक महिला सगळीकडे चौकशी करताना दिसून येत आहे संबंधित कार्यालयात त्यांना ई- केवायसी प्रक्रियेदरम्यान झालेल्या तांत्रिक चूका अथवा माहितीतील त्रुटींमुळे त्यांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे संतप्त व चिंताग्रस्त झालेल्या महिला पुढे आपले काय होणार आणि योजनेचा लाभ कसा मिळणार,असा सवाल उपस्थित करत आहेत. मात्र, या संदर्भात अद्याप कोणतीही स्पष्ट, ठोस अथवा अधिकृत मार्गदर्शन समोर आलेले नाही. ई - केवायसी तील तांत्रिक बिघाडामुळे अपात्र ठरलेल्या महिलांनी राज्य शासन व संबंधित विभागाकडे या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करत आहेत. महिलांचे म्हणने आहे की, तांत्रिक बिघाड चुकीच्या माहितीतुन जर त्या अपात्र ठरल्या असतील, तर शासनाने यांची दखल घेऊन ई- केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करावी, जेणेकरून मागील वेळी झालेल्या त्रुटींमुळे वंचित राहिलेल्या महिला पुन्हा पात्र ठरून योजनेचा लाभ घेऊ शकतील. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांप्रमाणेच देगलूर तालुक्यातील अनेक महिला चिंताग्रस्त असल्याचे दिसत आहे. यावेळी काही महिलांकडून असा आरोपही केला जात आहे की ई- केवायसी प्रक्रियेत दिशाभूल करणाऱ्या पद्धतीने पर्याय देण्यात आले, त्यामुळे त्यांच्याकडून चूका झाल्या आणि त्या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या. त्यामुळे ई- केवायसी प्रक्रिया पूर्णपणे नव्याने राबवून त्यांना लाभ देण्यात यावा, अशी मागणी महिलांनी केली आहे. पात्र असूनही लाभार्थी ठरले अपात्र लाडकी बहीण योजनेंतर्गत ई- केवायसी प्रक्रियेचा उद्देश अयोग्य व चूकीच्या पद्धतीने योजेनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थींना अपात्र ठरवणे हा होता. मात्र,ई- केवायसी नंतर पात्र महिलाच या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याचे चित्र समोर आले आहे. तसेच संबंधित विभाकडुन जनजागृती न केल्याने आणि योग्य माहिती न दिल्याने अनेक महिला अपात्र ठरल्याचा आरोपही करण्यात येत आहे. अशा प्रकारचे विविध आरोप महिलांकडून करण्यात येत आहेत.




## पाथर्डी एसटी आगारात १० वर्षांतील स्पेअरपार्ट व टायर खरेदीत कोट्यवधींचा घोटाळा; मुख्यमंत्री सचिवालयाकडे तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**



पाथर्डी तालुक्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) आगारामध्ये मागील दहा वर्षांच्या कालावधीत स्पेअरपार्ट, टायर व डिझेल खरेदी तसेच जुने स्पेअरपार्ट विक्री व्यवहारात मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याबाबत माहिती अधिकार महासंघाचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष प्रा. शैलेंद्र जायभाये यांनी मुख्यमंत्री सचिवालय, नाशिक विभाग यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.तक्रारीत नमूद केल्यानुसार, पाथर्डी एसटी आगारामध्ये संबंधित कालावधीत लाखो रुपयांचे बनावट बिले सादर करून आर्थिक अपहार करण्यात आला. डिझेल खरेदी, बसगाड्यांसाठी वापरलेले स्पेअरपार्ट दाखवून बनावट खरेदी नोंदी, टायर खरेदी तसेच इतर साहित्य खरेदीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घोटाळ्यात आगारप्रमुखांसह काही कर्मचारी सहभागी असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून घोटाळ्यात सहभागी असलेल्या सर्व दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करावी, तसेच संबंधितांना सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ करण्यात यावे, अशी मागणी प्रा. जायभाये यांनी केली आहे. यासोबतच, करण्यात आलेल्या प्रत्येक बाबींचा सविस्तर अहवाल तक्रारदाराकडे सादर करण्याचीही विनंती करण्यात आली आहे.

या गंभीर आरोपांमुळे पाथर्डी तालुक्यात खळबळ उडाली असून, शासनाकडून या प्रकरणी काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अंकिता पाटील ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



दैनिक वादळ वार्ता
**इंदापूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषदेच्या दि. ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी बावडा-लुमेवाडी जि. प. गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवार म्हणून अंकिता हर्षवर्धन पाटील (ठाकरे) यांचा उमेदवार अर्ज इंदापूर तहसील कार्यालयामध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे बुधवारी(दि. २१) दाखल करण्यात आला.

अंकिता पाटील ठाकरे यांचा अर्ज दाखल करणेसाठी हजारो कार्यकर्ते मिरवणुकीने इंदापूर शहरातील दूधगंगा दूध संघ ते तहसिल कार्यालय असे वाजत-गाजत आले होते, त्यामुळे परिसरात दुमदुमून गेला होता. अंकिता पाटील ठाकरे यांचा उमेदवारी अर्ज सुचक उदयसिंह विलासराव पाटील यांनी दाखल केला. यावेळी प्रदीपमामा जगदाळे, राजवर्धन पाटील, मनोज पाटील, निरा भिमा कारखान्याचे उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे, बावडा गावच्या सरपंच पल्लवी गिरमे उपस्थित होत्या. तसेच बावडा-लुमेवाडी जिल्हा परिषद गटा अंतर्गत बावडा पंचायत समिती गणातून धनश्री किरण पाटील (चाकाटी) व लुमेवाडी पंचायत समिती गटातून शिवाजी विजयसिंह मोहिते (टणु ) यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अंकिता पाटील ठाकरे यांनी पुणे जिल्हा परिषदेच्या मावळत्या सभागृहात सुमारे तीन वर्षे जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून प्रभावपणे काम केले आहे.

## दौंड तालुक्यातून तुतारी झाली गुल;आप्पा साहेब पवारांनी हाती घेतले कमळाचे फुल!

दैनिक वादळ वार्ता
**दौंड,पुणे । प्रतिनिधी**



दौंड तालुक्यातील राजकारणाने आता वेगळे वळण घेतले असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) गटाचे दौंड तालुका अध्यक्ष आप्पासाहेब पवार यांनी तुतारी सोडून आज हातात कमळ घेतले.

खडकी-देऊळगावराजे गटातून आप्पासाहेब पवार हे निवडणूक लढवणारच या निर्णयावर ठाम होते त्यांनी त्यांचा आज प्रत्येयच दाखवला, त्यांनी स्वतःचा उमेदवारी अर्ज दाखल करताना अर्जासोबत भारतीय जनता पार्टीचा ए.बी.फॉर्म सोबत जोडला. त्यामुळे दौंड तालुक्यात मोठी राजकीय खळबळ उडालेली पाहायला मिळाली.

तसेच अगदी शेवटच्या क्षणापर्यंत डॉक्टर हर्षदा वासुदेव काळे यांना उमेदवारी मिळणार अशी परिस्थिती असताना, तेवढ्याच तयारीने मोठे शक्ती प्रदर्शन करीत डॉक्टर हर्षदा वासुदेव काळे या समर्थकांसह उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी तहसील कार्यालयात हजर होत्या,परंतु अचानक माशी शिंकली आणि होत्याचे नव्हते झाले.खडकी-देऊळगावराजे गटात उमेदवारी अर्जासोबत लागणारा भारतीय जनता पार्टीचा ए.बी.फॉर्म अचानक आप्पासाहेब पवार यांच्या उमेदवारी अर्जासोबत जोडला गेला,त्यामुळे जमलेले तालुक्यातील कार्यकर्ते आपसात चर्चा करू लागले की तालुक्यातून आता तुतारी गायब झाली आहे.तसेच तहसील कार्यालयातील संपूर्ण घडामोडी पाहिल्यानंतर वासुदेव काळे त्यांच्या समर्थकांसह तहसील कार्यालयातून निघून गेले.आणि या ठिकाणी जाहीर नाराजी नाट्य देखील काही वेळ पाहिला मिळाले. खडकी-देऊळगावराजे गटातून भाजपाचे आप्पासाहेब पवार आणि राष्ट्रवादीचे विरधवल जगदाळे यांच्यामध्ये आता सरळ लढत होणार आहे.आणि या गटात आता काटें की टक्कर पाहावयास मिळणार हे मात्र नक्कीच,यावेळी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्यामुळे दिवसभर गोंधळ उडालेला पाहायला मिळाला.

## खडकी-देऊळगावराजे गटातून अपक्ष लढणार : अमर परदेशी

दैनिक वादळ वार्ता
**दौंड,पुणे । प्रतिनिधी**

खडकी-देऊळगावराजे जिल्हा परिषद गटातील साध्या राजकीय वातावरण चांगलेच तापलेले पाहायला मिळत असून,अमर परदेशी यांच्या भूमिकेकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहे,अमर परदेशी हे मलठण गावचे लोकनियुक्त सरपंच पारुबाई परदेशी यांचे सुपुत्र असून,आमदार राहुल कुल यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात,त्यांच्या राजकीय हलचालीमुळे भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांतील निवडणूकिचे गणित बिघडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या गटातून भाजपाकडून आप्पासाहेब पवार हे निवडणूक लढवत असून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून विरधवल जगदाळे हे उमेदवार म्हणून रिंगणात आहेत,अधिक विशेष म्हणजे हे दोन्ही उमेदवार पवारांच्या जवळचे आणि गटाच्या बाहेरील असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर रंगलेली पाहवयास मिळत आहे.



आप्पासाहेब पवार यांनी ऐनवेळी राष्ट्रवादी कांग्रेसमधून भाजपात प्रवेश केल्याने भाजपच्या स्थानिक नेत्यांमध्ये नाराजी पाहवयास मिळत आहे, भाजपाचे ज्येष्ठ नेते वासुदेव काळे,माजी जिल्हा परिषद सदस्य संजय काळभोर यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी यावेळी नाराजी व्यक्त केली.सदरची नाराजी कोणाच्या पथ्यावर,तर कोणाची 'विकेट' घेणार, याबात राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

आशा परिस्थितीत अमर परदेशी नेमकी कोंणती भूमिका घेतात,आणि स्थानिक मतदारांचा कल काय सांगतो,यावर या गटातील निवडणूकीचे भवितव्य अवलंबून असणार आहे.त्यामुळे खडकी-देऊळगावराजे गटाची लढत मोठी चुरशीची होणार असून,आगामी काळात येथील राजकारणात मोठ्या हालचालींना वेग येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## प्रशासकीय उदासीनतेमुळे किनवट शहरात भटक्या जनावरांच्या घटनांमध्ये वाढ, सामान्य नागरिक मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरांच्या वाढत्या संख्येमुळे दुर्घटना होण्याची भीती

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

किनवट शहरात नागरी समस्यांनी अक्षरशः रौद्र रूप धारण केले असून, शहर सध्या 'मोकाट' संकटाच्या विळख्यात सापडले आहे. रस्त्यांपासून मुख्य गल्लीबोळांपर्यंत मोकाट जनावरांचा हैदोस आणि बेफाम अवैध पार्किंगमुळे सर्वसामान्य नागरिकाचे दैनंदिन जीवन असह्य झाले आहे. सोमवारी नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीसमोरच घडलेल्या भीषण अपघाताने नव्याप्रशासनाच्या निष्क्रियतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. टिंगणवाडी येथील रमेश चव्हाण हे पत्नी व दोन लहान मुलांसह स्कुटीवरून प्रवास करत असताना, नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसमोरच एका मोकाट गाढवाने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात रमेश चव्हाण यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून ते मृत्यूशी झुंज देत आहेत.आकर्षित करत असून, परिणामी वाहतूक कोंडी व अपघाताचे प्रमाण वाढत आहे.पत्नी व मुले किरकोळ जखमी झाली असली, तरी या घटनेने संपूर्ण शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे, ज्या नगरपरिषदेवर मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी आहे, त्याच इमारतीसमोर हा अपघात घडल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आहे.

**नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचे 'मौन' की ?**


निवडणुकीपूर्वी विकासाची मोठी आश्वासने देणारे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक सध्या कुठे आहेत? असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत. प्रशासनाचा धाक संपल्यामुळेच पशुमालक बिनधास्तपणे जनावरे मोकाट सोडत असून, त्यांच्यावर कारवाई करण्याचे धाडस नगरपरिषद दाखवत नसल्याचा आरोप होत आहे. आम्ही फक्त कर भरण्यासाठी आहोत का? सुरक्षित रस्ते देणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही का? तात्काळ कोंडवाडा सुरू झाला नाही आणि पार्किंगचा प्रश्न सुटला नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरू. किनवट शहराचे नागरिकांच्या प्रमुख मागण्या

तात्काळ कोंडवाडा सुरू करून मोकाट जनावरे पकडावीत व मालकांवर फौजदारी कारवाई करावी., मुख्य रस्त्यांवर 'नो पार्किंग' झोनची कठोर अंमलबजावणी करावी. अपघातप्रवण ठिकाणी गतिरोधक बसवून पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी.

प्रशासनाला इशाराआता केवळ आश्वासनांनी नागरिकांचे समाधान होणार नाही. रमेश चव्हाण यांच्यासारखे निष्पाप नागरिक बळी पडत असताना नगरपरिषद प्रशासन ठोस पावले उचलणार की आणखी एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहणार, हा प्रश्न किनवटकरांच्या मनात आहे. येणारा काळच प्रशासनाची खरी परीक्षा घेणार आहे.

**शहरातील प्रमुख समस्यांचा 'डोंगर'**

मोकाट जनावरांचे साम्राज्य गाढवे, खेचरे, कुत्रे यांचा शहरातील मुख्य रस्त्यांवर मुक्त संचार सुरू आहे. रात्रीच्या वेळी ही जनावरे वाहनचालकांसाठी 'मृत्यूचे सापळे' ठरत आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077